# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dteaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/ ८६६७

दिनांक :- 4 DEC 2018

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय /अनुदानित/विना-अनुदानित/अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र/व्यवस्थापन शास्त्र/
वास्तुशास्त्र, पदवी, पदविका, पद्व्युत्तर पदवी संस्था

**औरंगाबाद विभाग**

विषय : **शुल्क नियामक प्राधिकरण यांचे शुल्काबाबतचे निर्देश. . . .**

०१ मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. शुनिप्रा/१०६७/२०१८, दिनांक ०३/१०/२०१८

०२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/शु.नि.प्रा.निर्देश/२०१८/४२३, दिनांक १६/११/२०१८

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महाडीबीटी पोर्टलमध्ये प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क संस्थांकडून अनावधानाने भरले गेल्यास व सदर शुल्क प्राधिकरणामार्फत मंजूर करण्यात आल्यानंतर सदर कमी शुल्क विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रुपाने मंजूर झाल्यास शुल्क नियामक प्राधिकरणाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. त्यामुळे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क अचुकरित्या व काळजीपूर्वक पोर्टलवर भरण्याबाबत पुनःश्च सुचित करण्यांत येत आहे.

महाडीबीटी पोर्टलवर, शैक्षणिक वर्षनिहाय शुल्क भरताना कोणतीही चूक न करता अत्यंत काळजीपूर्वक व अचूकरित्या पोर्टलमध्ये भरावे, तथापि, अनावधानाने आपणाकडून कमी शुल्क पोर्टलमध्ये भरल्यामुळे विद्यार्थ्यांना कमी शुल्क मंजूर झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. तसेच उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांकडून वसूल करता येणार नाही. तसे केल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्यांत येईल, या बाबत संचालनालयाने संदर्भ क्र. २ अन्वये कळविलेले आहे, याची नोंद घ्यावी.

सोबत : वरील प्रमाणे

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : ०१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
०२. प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्दी करीता.

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७
E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

रजिस्टर एडी / ईमेलद्वारे

क्र.१८/तंशिसं/ शु.नि.प्रा.निर्देश /२०१८/४२३
दि. १६/११/२०१८

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय : शुल्क नियामक प्राधिकरण यांचे शुल्काबाबतचे निर्देश.....**
संदर्भ : सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. शुनिप्रा/१०६७/२०१८ दि.३/१०/२०१८

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महाडीबीटी पोर्टलमध्ये प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क संस्थांकडून अनावधानाने भरले गेल्यास व सदर शुल्क प्राधिकरणामार्फत मंजूर करण्यात आल्यानंतर सदर कमी शुल्क विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रुपाने मंजूर झाल्यास शुल्क नियामक प्राधिकरणाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. त्यामुळे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क अचुकरित्या व काळजीपूर्वक पोर्टलवर भरणाच्या सूचना देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. ( सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने, आपल्या अखत्यारितील सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे की, "महाडीबीटी पोर्टलवर, शैक्षणिक वर्षनिहाय शुल्क भरताना कोणतीही चूक न करता अत्यंत काळजीपूर्वक व अचूकरित्या पोर्टलमध्ये भरावे. तथापि, अनावधानाने आपणाकडून कमी शुल्क पोर्टलमध्ये भरल्यामुळे विद्यार्थ्यांना कमी शुल्क मंजूर झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. तसेच उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांकडून वसूल करता येणार नाही. तसे केल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी."

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 9942
दिनांक 26 NOV 2018

( डॉ. अभय वाघ.)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत - कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २, २अ, ३,१० मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहीतीसाठी.

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हेव्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई-४०००५१

E-mail: secfra.mu-mh@gov.in/fra.govmh@gmail.com
Website: www.sssamiti.org
दुरध्वनी : ०२२ - २६४७०४६३

क्रमांक :शुनिप्रा/1067/२०१८ दिनांक : ०३/१०/२०१८

प्रति,

प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण,मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, व्हीजेएनटी, ओबीसी व एसबीसी कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त (आदिवासी विकास विभाग), नाशिक
संचालक (उच्च शिक्षण), पुणे
संचालक (तंत्र शिक्षण) , मुंबई
संचालक (वैद्यकीय शिक्षण), मुंबई

9 OCT 2018

महोदय,

शासनाने लाभार्थ्यांना बॅंक खात्यांमध्ये त्यांना देय असलेल्या अनुदानाची / लाभाची रक्कम थेट जमा करण्यासाठी आपले सरकार महा डीबीटी पोर्टल सुरु केले आहे. या पोर्टलद्वारे लाभार्थी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनुज्ञेय होणाऱ्या फ्रीशीप्स, स्कॉलरशिप्सची रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बॅंक खात्यांमध्ये थेटरित्या जमा करण्यात येणार आहे. सदर पोर्टलवर शुल्क नियामक प्राधिकरणास स्वतंत्र युजर आयडी व लॉग ईन पासवर्ड देण्यात आलेला असून याद्वारे संस्थामार्फत पोर्टलवर वर्षनिहाय भरण्यात आलेल्या फी ची शुल्क नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरुन पडताळणी करण्यात येऊन सदर फी तेवढीच अथवा त्यापेक्षा कमी असल्यास ती मंजूर करण्यात येते. प्राधिकरणाने मंजूर केलेल्या फी पेक्षा जास्त फी दर्शविण्यात आल्यास ती कारणांसहित अमान्य करण्यात येते.

तथापि काही संस्था नजर चुकीने अथवा अनावधानाने प्राधिकरणाने मंजूर केलेल्या फी पेक्षा कमी फी उपरोक्त पोर्टलवर भरतात. सदर फी प्राधिकरणामार्फत मंजूर करण्यात आल्यानंतर मंजूर करण्यात आलेल्या कमी फी च्या आधारे विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/

मुंबई
22577
15/10/18